**सं.के.नं.१५२/२०२३**
**नि.क्र. १३/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. ३** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | हिरालाल सिताराम यादव |
| वय | - | ४१ वर्षे |
| व्यवसाय | - | व्यापार |
| राहणार | - | उरण, ता. उरण जि. रायगड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे...**

१. मी मागील पाच वर्षापूर्वी चंद्रकांत ठक्कर यांचेकडे काम करत होतो. मी तेथे मिठाई बनविण्याचे काम करीत होतो. मिठाई बनविण्याचा कारखाना चंद्रकांत ठक्कर याचे घरा समोर होता. त्यावेळी तेथे माझे सोबत इतर बरेच जण मिठाई बनविण्याचे काम करीत असत. तो कारखाना मयुर मेडीकलच्या समोर होता. मिठाई बनविण्यासाठी शेगडी, सिलेंडर व इतर वस्तू लागतात. त्यावेळी तेथे दोन ते तीन सिलेंडर राहत असत. चंद्रकांत ठक्कर यांचे कुटूंबात वाद होता. त्यावेळी सिलेंडर द्वारे आग लागल्यास ती विझविण्यासाठीची उपाय योजना होती. मी चंद्रकांत ठक्कर यांना ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे आरोपीचे वकील श्री. भानुशाली यांच्याव्दारे...**

२. माझे मुळगांव चंदवली (वाराणसी) हे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पाच वर्षापूर्वी चंद्रकांत ठक्कर यांचेकडे काम करत होतो हे दर्शविण्यासाठी माझे तोंडी पुराव्या व्यतिरिक्त इतर कोणता पुरावा नाही. मी उरण येथे रहात असल्याबाबतचा

कोणताही कागदोपत्री पुरावा पोलीसांना दिला नव्हता. मी चंद्रकांत ठक्कर यांचे कडे काम करत होतो याबाबतचे कोणतेही दस्त माझे कडे नाही. मी प्रकाश ठक्कर यांना ओळखतो. चंद्रकांत ठक्कर व प्रकाश ठक्कर यांच्यात कौटूंबीक वाद असल्याबाबत मला माहिती झाले होते. मी पोलीसांना जबाब दिला होता. सदर केस फिर्यादी प्रकाश ठक्कर यांनी दाखल केलेल्या तक्रारी वरुन दाखल असल्याचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणात साक्ष दयायची आहे असे मला प्रकाश ठक्कर यांनी सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकाश ठक्करच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर केस कशासाठी दाखल केली याची मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर केस कशासाठी दाखल केली याबाबत पोलीसांनी मला सांगितले नाही. मला मराठी लिहिता व वाचता येत नाही. माझा जबाब पोलीसांनी हिंदी भाषेत लिहून घेतला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश ठक्कर याला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)

उरण,
दिनांक –२१/११/२०२५